संं.फौ.ख.क्र.४/२०२३
**सरकार वि. संजय सोन्नूर**
**निशाणी क्र. १४**

## अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र.१ यांची साक्ष

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

**माझे नाव** :– राहूल नारायण वाघमारे
**वय** :– ५८ वर्षे, **धंदा** :– मजूरी,
**राहणार** :– दिघंची, ता. आटपाडी, जि. सांगली.

## सरतपासणी अभियोगपक्षातर्फे – श्री. बी.डी. काळे, विद्यमान सहा. सरकारी वकील यांचेमार्फत

**०१.** दिनांक २७/०४/२०२२ रोजी पोलीसांनी पंचनाम्यासाठी आटपाडी येथे बोलवले होते. पंचनामा कशाचा केला होता व काय केला होता हे मला सांगता येत नाही. असे घडले नाही की, मी पोलीसांबरोबर कोठे पंचनाम्याला गेलो होतो. आता मला घटनास्थळ पंचनामा दाखविला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर मला माहिती नाही.

**सदर साक्षीदार अभियोगपक्षास पुराव्याकामी सहकार्य करीत नसल्यामुळे विद्यमान सहा. सरकारी वकील यांना तोंडी विनंती वरुन साक्षीदारास उत्तरसुचक प्रश्न विचारण्याची परवानगी देण्यात आली**

**०२.** असे घडले नाही की दिनांक २७/०४/२०२२ रोजी हिवतड ते गोमेवाडी जाणा–या रोडवर पोलीस माने यांनी माझ्यासमक्ष उमाजी पांडूरंग सरगर यांनी दाखविलेल्या अपघात स्थळाचा पंचनामा माझ्यासमक्ष केला व त्यावर मी वाचून सही केली. आता मला पंचनाम्यातील पोर्शन मार्क – अ वाचून दाखविला. तो पोलिसांनी माझ्यासमक्ष लिहिला नव्हता. सदर बाब माझ्या समक्ष पंचनाम्यात लिहिली आहे असे नमूद असण्याचे कारण मला सांगता येणार नाही. माझे शिक्षण बी.ए. पर्यंत झालेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी कागद वाचून सही करतो. हे म्हणण खरे आहे की, पंचनामा मला वाचून दाखविला होता, त्यानंतर मी सही केली. हे म्हणणे खरे आहे की, मजकूर

**सं.फौ.ख.क्र.४/२०२३**
**सरकार वि. संजय सोन्नूर**
**निशाणी क्र. १४**

मला समजला असल्यामुळे मी सही केली होती. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींना वाचविण्यासाठी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास आरोपीतर्फे – श्री.एस. आर. कदम, विद्यमान वकील यांच्यामार्फत सुरु**

**०३.** नाकारला.

**उलटतपास संपला.**

**फेरतपास काही नाही.**

श्रवणोत्तर स्विकृती,
समक्ष,

RAHUL BHALCHANDRA KULKARNI
Digitally signed by RAHUL BHALCHANDRA KULKARNI
Date: 2026.03.25 13:58:09 +0530

दि.२५/०३/२०२६
आटपाडी.

( आर. बी. कुलकर्णी )
सह न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,
आटपाडी